# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.02.2026** **वारःमंगळवार**

---

•राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणानं सुरुवात

•विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण वातावरणात श्रद्धांजली

•राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर

आणि

•राज्यात विविध ठिकाणी पाऊस, रब्बी पिकांचं नुकसान होण्याची भीती

**विधीमंडळ**

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला काल राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणानं सुरुवात झाली. या अभिभाषणात राज्यपालांनी राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला. स्थूल राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचं योगदान साडे तेरा टक्के असून देशात सर्वात जास्त परदेशी गुंतवणूक आकर्षित करणारं राज्यही महाराष्ट्रच असल्याचं ते म्हणाले. उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारनं आखलेल्या विविध धोरणांची तसंच महिला, आदिवासी, मागास समूहांच्या प्रगतीसाठी सरकार राबवत असलेल्या धोरणांची माहिती राज्यपालांनी दिली.

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात काल दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला.

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकप्रस्ताव मांडला. कर्तृत्ववान, शिस्तप्रिय आणि निश्चयी नेतृत्व असलेल्या अजितदादांच्या निधनामुळे आपण वैयक्तिक मित्र गमावला असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. राज्याच्या विकासात अजित पवार यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अन्य नेत्यांनीही अजितदादांविषयीच्या आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

राज्याच्या राजकारणाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्यात अजित पवार यांचं नाव नक्की असेल असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले.

दिवंगत सुरुपसिंग नाईक, शालिनीताई पाटील, राज पुरोहित, गंगाधर पटने, नीळकंठ फालक, विश्वास नांदेकर आणि रुपलेखा ढोरे यांच्या निधनाबद्दलही शोक व्यक्त करण्यात आला.

विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, अजितदादा आणि अन्य दिवंगत नेत्यांच्या निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव मांडला. अजित पवार यांनी पाहिलेलं विकासाचं स्वप्न पूर्ण करणं, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा निर्धार शिंदे यांनी व्यक्त केला.

आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात अजित पवारांची आपल्याला भक्कम साथ मिळाली असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन आज मुंबईत लोकभवन इथं राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर उद्या बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय आरोग्य

मेळ्यालाही राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. नागपुरात आयोजित 'एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग' या उपक्रमाच्या उद्घाटन समारंभालाही त्या उपस्थित राहणार आहेत.

**<u>राजाजीउत्सव</u>**

देशाचे पहिले भारतीय गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी अर्थात राजाजी यांच्या राष्ट्रपती भवनातील पुतळ्याचं अनावरण काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आलं. राष्ट्रपती भवनातला अशोक मंडपाजवळचा एडविन ल्युटिन्स यांचा पुतळा काढून त्याठिकाणी राजाजींचा पुतळा बसवण्यात आला आहे. राजाजींच्या जीवनातून प्रेरणा घेऊन राष्ट्र प्रथम या भावनेनं नागरिक काम करत राहतील अशी आशा राष्ट्रपतींनी यानिमित्त आयोजित राजाजी उत्सवात व्यक्त केली. याप्रसंगी उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांच्यासह केंद्रिय मंत्री आणि राजगोपालाचारी यांचे कुटुंबिय उपस्थित होते.

**<u>संतगाडगेबाबाजयंती</u>**

संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त राज्यात सर्वत्र त्यांना अभिवादन करण्यात आलं. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल लोकभवन इथं त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

**<u>मुदतवाढ</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात हंगामी वृत्त निवेदक आणि भाषांतरकार, या पदासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. या पदासाठी अर्ज दाखल करण्याकरता मुदतवाढ देण्यात आली असून, आता 5 मार्च 2026पर्यंत अर्ज दाखल करता येतील. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असलेल्या २१ ते ५० या वयोगटातील व्यक्ती या पदासाठी अर्ज करू शकतात. पत्रकारितेची पदव्युत्तर पदविका किंवा 5 वर्षांचा मुद्रित अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य असेल. ही नियुक्ती आवश्यकतेनुसार फक्त हंगामी तत्वावर असेल. सविस्तर माहिती आणि विहीत नमुन्याचा अर्ज भरण्यासाठी

Newsonair.gov.in/vacancies

PrasarBharati.gov.in/pbvacancies

या संकेतस्थळांना भेट द्यावी.

**Intro**

**व्हॉइसकास्ट-पक्षीमित्रसंमेलन**

रत्नागिरीत वन विभागाने आयोजित केलेल्या पहिल्या पक्षिमित्र संमेलनाचा काल समारोप झाला. विभागीय वनाधिकारी गिरिजा देसाई, माजी प्रधान मुख्य वनसंरक्षक सुनील लिमये यांच्यासह वन विभागाचे अनेक वरिष्ठ अधिकारी या संमेलनात सहभागी झाले होते. पर्यावरणातलं पक्ष्यांचं स्थान लक्षात घेऊन त्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं विचारमंथन राज्यभरातल्या पक्षिमित्रांनी यामध्ये केलं. अधिक वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून...

**स्क्रिप्ट**

*देवराया, किनारपट्टी आणि सह्याद्रीचं समृद्ध जंगल अशा वेगवेगळ्या अधिवासांमुळे रत्नागिरीत पक्ष्यांच्या साडेतीनशेहून अधिक प्रजाती आढळतात. धनेशच्या जिल्ह्यातील चार जातींपैकी महाधनेश अर्थात ग्रेट हॉर्नबिल हा जिल्हा पक्षी म्हणून घोषित करण्यात आला. पर्यावरण पर्यटनाला चालना देण्यासाठी असा निर्णय घेणारा रत्नागिरी हा राज्यातला बहुधा पहिलाच जिल्हा असावा. आजही रत्नागिरीने ११६९ देवराया संरक्षित राखल्या आहेत; मात्र धनेश पक्ष्यांना घरट्यांसाठी जे मोठे वृक्ष लागतात, त्यांची संख्या कमी होतेय. याचं गांभीर्य ओळखून सह्याद्री संकल्प सोसायटीसारखी संस्था धनेशसंवर्धनासाठी विविधांगी काम करते. त्या संस्थेचे प्रतीक मोरे यांच्यासह विविध कार्यकर्त्यांनी या वेळी अभ्यासपूर्ण सादरीकरण केलं. टपाल तिकिटांचं प्रदर्शन, गिधाड संवर्धनाचा प्रभावी संदेश देणारं कल्चर्ड व्हल्चर हे संगीत नाटक, तसंच प्रत्यक्ष पक्षिनिरीक्षण ही या संमेलनाची वैशिष्ट्यं होती. 'वनं वाचवू, तरच वाचू आणि त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊ' हा या संमेलनाने दिलेला संदेश आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी*

**दीक्षांतसमारंभमनोजपांडे**

युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचं मत माजी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी व्यक्त केलं. ते काल अमरावती इथं संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाताना चारित्र्य, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत असं त्यांनी

सांगितलं. कृत्रिम बुद्धीमत्ता रोजगाराची नवीन दालनं उघडणारा तंत्रमित्र ठरेल, असं विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मिलिंद बारहाते यावेळी म्हणाले.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भाजपचे श्रीनाथ भिमाले यांची बिनविरोध निवड झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सुहास टिंगरे यांचा उमेदवारी अर्ज एक मिनिट उशिरा दाखल झाल्याचं कारण देत अवैध ठरवल्यानं ही निवडणूक बिनविरोध झाली.

**<u>पाऊसगारपीट</u>**

यवतमाळ जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसासह जोरदार गारपीट झाल्यामुळे गहू, हरभरा या पिकांचं नुकसान झालं आहे. सोसाट्याच्या वाऱ्यात अनेक झाडं उन्मळून पडल्यानं काही घरांचंही नुकसान झालं.

सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी हलका पाऊस पडला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातही काल पावसानं हजेरी लावली. या ढगाळ हवामानाचा आंबा आणि काजू पिकावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात काल मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे गहू, हरभरा, कापूस, मिरची इत्यादी पिकांचं नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

लातूर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. रेणापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात गारपीटही झाली आहे. उदगीर तालुक्यातील वायगाव इथं अंगावर वीज पडून एक शेतकऱ्याचा मृत्यू झाला. या पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांसह पावसाची शक्यता असून मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**